# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

## २०२०-२१

क्रमांक: एनकाे/५८२०/लेख्या दिनांक: २४/०६/२०२०

**विषय:** कोविड-१९च्या उपाययोजनांकरीता नगरसेवक निधीमधील रु.१० लाखापर्यंतचा निधीमधून Arsenic Album – 30 होमिओपॅथिक औषध उपलब्ध करून देण्याबाबत.

**संदर्भ:** १) प्रले/एफडीटी/१५ दिनांक: ३०.०४.२०२०
२) प्रले/एफडीटी/१६ दिनांक: ३०.०४.२०२०
३) प्रले/एफडीटी/१७ दिनांक: ३०.०४.२०२०

---

उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रक क्रमांक प्रले/एफडीटी/१५ दिनांक: ३०.०४.२०२०, प्रले/एफडीटी/१६ दिनांक: ३०.०४.२०२० आणि प्रले/एफडीटी/१७ दिनांक १४.०५.२०२० अन्वये नगरसेवक निधी वापरण्याकरीता व सदर निधी कोणत्या बाबींवर खर्च करावा याबाबत मार्गदर्शक तत्त्वे प्रसारीत करण्यात आली आहेत. सदर निर्देशांमध्ये **"Arsenic Album – 30 या होमिओपॅथिक औषधाचे विभागनिहाय वितरण संबंधित सहाय्यक आयुक्त यांच्यामार्फत करणे."** या बाबीचा समावेश करण्यात येत आहे. सदर तिन्ही परिपत्रकातल्या उर्वरित सर्व बाबींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

तसेच कोरोनाचे संकट लक्षात घेता मुंबईतील नगरसेवकांकडून त्यांच्या प्रभागातील नागरीकांना कोरोना रोगापासून सूरक्षा व कोरोना नियंत्रित करुन त्यावर उपाययोजना करण्याकरीता नगरसेवक निधी वापरण्याकरीता रु.१० लाख एवढा निधी तातडीने उपलब्ध करून दिला आहे तो निधी पूर्ण खर्च झाल्यास नगरसेवक निधीमधून रु.५ लाख एवढा अतिरिक्त निधी वापरण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीसापेक्ष उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सर्व खातेप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांनी याची नोंद घ्यावी व महाराष्ट्र शासनाच्या याबाबतच्या मार्गदर्शक तत्वांस अधिन राहून कार्यवाही करावी.

(पद्मजा केसकर)
कार्यकारी आरोग्य अधिकारी

(प्रदिप पडवळ)
प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.

(रमेश पवार)
सह आयुक्त (सा.आ.)

(सुरेश काकाणी)
अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे)

(पी.वेलरासू)
अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

(इ.सिं. चहल)
महानगरपालिका आयुक्त

E: Pote /2020-21 /Covid Circular -38